## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 20/11/2019 (बुधवार)
## (दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. खापा :– दिनांक 12/11/2019 चे 15:00 वा. ते दिनांक 13/11/2019 चे 17:30 वा. पावेतो फिर्यादी यांच्या 8 वर्षीय मुलगी/पीडित ही घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– रवि काशीनाथ नांदनवार, वय 35 वर्ष, रा. हनुमान घाट शहारपुरा, खापा, ता. सावनेर याने ती एकटी असल्याचे पाहुन तिच्या घरात जावुन पीडितेसोबत बळजबरीने गैरवर्तन केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 376, 376(अ)(ब) भादंवि. सहकलम 4, 5 एम, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि श्री. सोनाली रासकर 9082196080 या करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर बॉडर चेक पोस्ट कान्द्री येथे दिनांक 14/11/2019 चे 12.58 वा. ते 13:36 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रदीप कुमार सिंग वल्द सुरेश बहादुर सिंग, रा. आशापुर जि. प्रतापगड आरटीओ बॉर्डर चेक पोस्ट कांन्द्री माईन्स हे स्टेट बॅक ऑफ इंडीयाचे खातेधारक आहेत. अज्ञात आरोपीने मोबाईलने फिर्यादींना फोन करून एसबीआय बॅकेचे क्रेडीट कार्डची माहिती हस्तगत केली. यानंतर आरोपीने या माहितीच्या आधारावर क्रेडीट कार्ड व्दारे ऑनलाईन पद्धतीने फिर्यादींच्या खात्यातून 16,499/–रू. ची खरेदी करून फिर्यादींची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम सहकलम 66 (क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री ठाकुर हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. अरोली :– दि. 19/11/2019 चे 18:30 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 17 वर्षीय पीडित ही मैत्रिणीसह घरासमोर बोलत होती. दरम्यान आरोपी नामे– राजा सलीम शेख, वय 23 वर्ष, रा. कोदामेंढी हा तेथे आला व पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेस अश्लिल शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 294, 354, 506 भादंवि. सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक सहकलम अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार

प्रतिबंधक अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती नयन आलुरकर या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर